महाराष्ट्र शासन

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर


फॅक्स नं.०२३१-२६४४३६९

टेलिफोन नं-०२३१-२६४१५८३ वेबसाईट - www.rcsmgmc.ac.in

ईमेल- storercsmgmck@gmail.com


जा.क्र/राछशामशावैमवछप्रासरुको/आस्था ४/ 2645 /२०२५ दिनांकः- 14 /8/२०२५

## प्रसिध्दीपत्रक

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापुर या संस्थांमधील गट - ड (वर्ग -४) संवर्गातील सरळसेवा भरती - निवड यादी व प्रतिक्षा यादीमधील उमेदवारांच्या कागदपत्र पडताळणीबाबत..**

महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई अधिनस्थ आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई अंतर्गत अधिष्ठाता,राजर्षी छत्रपती शाहु महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय यांच्या आस्थापनेवरील गट-ड (वर्ग-४) संवर्गातील विविध रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरिता दिनांक १९ मे, २०२५ रोजी महाराष्ट्रातील विविध परिक्षा केंद्रांवर एकूण ०२ सत्रांमध्ये घेण्यात आलेल्या परिक्षेमध्ये पदनिहाय निवड यादी व प्रतिक्षा यादी यापूर्वी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

पदनिहाय निवड यादीमध्ये तसेच प्रतिक्षा यादीमध्ये समाविष्ट असणा-या उमेदवारांना दिनांक २१/०८/२०२५ रोजी सकाळी ठिक ११:०० वाजता कागदपत्रे पडताळणीकरिता बोलविण्यात येत आहे. उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरच्या प्रसिध्दीपत्रकासोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या यादीप्रमाणे सर्व मूळ कागदपत्रे व सर्व कागदपत्रांच्या दोन छायांकित प्रती घेऊन उपस्थित राहावयाचे आहे. कागदपत्रे पडताळणीचे ठिकाण तसेच दिनांक व वेळ खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कागदपत्रे पडताळणीचे ठिकाण | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापुर, शेंडा पार्क, आर.के.नगर रोड, कोल्हापुर. पिन -४१६०१२ |
| कागदपत्रे पडताळणीचा दिनांक | दिनांक २१/०८/२०२५ |
| कागदपत्रे पडताळणीची वेळ | ठिक ११:०० वाजता |

पदनिहाय निवडसूची तसेच प्रतिक्षासूचीमध्ये समाविष्ट असणा-या सर्व उमदेवारांनी कागदपत्रे पडताळणीकरिता विहीत वेळेत उपस्थित राहणे बंधनकारक आहे. सदरचे प्रसिध्दीपत्रक www.rcsmgmc.ac.in व kolhapur.gov.in या अधिकृत संकेतस्थळांवरुन प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी सर्व उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

अधिष्ठाता
छत्रपती प्रमिलाराजे
सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर

अमोल येडगे, (भा.प्र.से)
जिल्हाधिकारी, कोल्हापुर तथा
अध्यक्ष, जिल्हा निवड समिती,
गट ड (वर्ग ४) सरळसेवा भरती

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापुर गट ड (वर्ग ४) सरळसेवा भरती

### उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीस घेऊन यावयाच्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र | कागदपत्रे |
|---|---|
| १ | संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या मूळ अर्जाची प्रिंट आऊट. |
| २ | उमेदवाराने भरलेल्या अर्जातील नावाचा पुरावा. |
| ३ | सामाजिकदृष्टया मागासवर्गीय असल्याबाबतचा पुरावा |
| ४ | अर्जदाराची माहिती बरोबर असल्याचे स्वयंघोषणापत्र |
| ५ | शैक्षणिक अर्हतेचा पुरावा. (एस.एस.सी गुणपत्रक व प्रमाणपत्र) |
| ६ | वयाचा पुरावा |
| ७ | जन्माचा पुरावा |
| ८ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा |
| ९ | राखीव प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांचे संबंधित प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र |
| १० | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र |
| ११ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा |
| १२ | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा |
| १३ | खेळाडूसाठीच्या आरक्षणाकरिता पात्र असल्याचा पुरावा |
| १४ | अनाथ आरक्षणाकरिता पात्र असल्याचा पुरावा |
| १५ | प्रकल्पग्रस्त आरक्षणाकरिता पात्र असल्याबाबतचा पुरावा |
| १६ | भुकंपग्रस्त आरक्षणाकरिता पात्र असल्याबाबतचा पुरावा |
| १७ | महाराज्य राज्याचा अधिवास प्रमाणपत्र |
| १८ | महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगीतलेल्या ८६५ गावांमधील मराठी भाषिक उमेदवारांना सक्षम प्राधिका-याचा विहीत नमुन्यातील दाखला |
| १९ | विवाहीत स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा |
| २० | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा |
| २१ | लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र |
| २२ | पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन असल्याबाबतचे प्रमाणपत्र |
| २३ | नावातील बदलाबाबत प्रमाणपत्र/शासन राजपत्र (लागू असल्यास) त्याबाबतचा पुरावा |
| २४ | छायाचित्र ओळख पुरावा (आधारकार्ड, वाहन परवाना, पॅनकार्ड, राज्य निवडणूक आयोगाचे निवडणूक ओळखपत्र, पारपत्र, राष्ट्रीयकृत बँकेचे खातेपुस्तक) |
| २५ | वयामध्ये सवलत घेत असल्यास त्याबाबतचा पुरावा. |

सर्व उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी कागदपत्रे पडताळणीस उपस्थित राहताना वरीलप्रमाणे नमूद केलेली मूळ कागदपत्रे तसेच सर्व कागदपत्रांच्या दोन स्वसाक्षांकित प्रती घेऊन उपस्थित राहावयाचे आहे.

डॉ.एस.एस.मोरे,
अधिष्ठाता,
राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय,
कोल्हापुर तथा
समिती सदस्य, जिल्हा निवड समिती

श्री.अमोल येडगे, (भा.प्र.से)
जिल्हाधिकारी, कोल्हापुर
तथा
अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, गट -ड